महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दुरध्वनी क्रमांक ०२२-२२८२०४५५
दिनांक ७ ऑक्टोबर, २०२४

# सूचना

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे वाहन चालक या पदावर कंत्राटी पध्दतीने काम करण्यासाठी एकूण २ कुशल कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. तसेच शिपाई या पदावर कंत्राटी पध्दतीने काम करण्यासाठी एकूण १३ अकुशल कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. किमान ५ वर्षे अनुभव असणाऱ्या मनुष्यबळ पुरविण्याऱ्या पात्र संस्था तसेच निविदेमधील अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक पात्र नोंदणीकृत संस्थांकडून निविदा मागविण्यात आल्या असून मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराची निवड करण्याकरीता सह सचिव (आस्थापना), नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती स्थापन करण्यात आली आहे.

०२. प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ०७.१०.२०२४ रोजी निवड समिती समोर सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. त्यानंतर निविदाकारांची पात्र/ अपात्र यादी महाराष्ट्र शासनाच्या https://maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

०३. तरी निविदा सादर करण्यात आलेल्या संस्थेच्या केवळ प्रत्येकी एक प्रतिनिधी दिनांक ०७.१०.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित रहावे.

सदर सूचना महाराष्ट्र शासनाच्या https://maharashtra.gov.in यया अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(देवानंद शे.महाजन)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२